Sir,
Draft for approval pl.
slisawant
19/03/19

No. EAU/ICD/2018-19/679
dt. 19/3/19 (1)

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र./२०१८-१९

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१८-१९ मधील २३ फेब्रुवारी, २०१९ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१८-१९ मधील नववी बैठक शनिवार दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी बैठक दुपारी ३.३० वाजता **व्यवस्थापन परिषदेचे दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई-** ४०० ०९८ येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | प्रा. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्या |
| ५. | प्रा. डॉ. अजय भामरे | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ७. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ८. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| ९. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १०. | डॉ. विनोद पाटील (अतिरिक्त कार्यभार कुलसचिव (प्र.)) | सदस्य सचिव |
| ११. | डॉ. कविता लघाटे (अतिरिक्त कार्यभार वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➤ **अनुपस्थिती :-**

सदर सभेस खालीस सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ रोहिदास काळे<br>संचालक, उच्च शिक्षण, संचालनालय | सदस्य |
| २. | सचिव, उच्च शिक्षण विभाग | सदस्य |
| ३. | डॉ. अभय वाघ (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय) | सदस्य |
| ४. | प्रा.(डॉ.) मुरलीधर कु-हाडे | सदस्य |

SK



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५. | डॉ. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ७. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ८. | प्रा. बी.एन. जगताप | सदस्य |

प्रा. (डॉ.) मुरलीधर कु–हाडे, प्रा. (डॉ.) महादाप्पा गं. गोंडा, प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे, ॲड. निल हेळेकर, प्रा. बी.एन. जगताप यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांना अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

**स्वागत**

प्र-कुलगुरूंनी सर्व सन्माननीय सदस्यांचे बैठकीत स्वागत करून सभेस सुरूवात केली.

**➢ श्रध्दांजली**

## समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस

समाजवादी नेते आणि केंद्रीय संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८८ वर्षाचे होते.

## श्री. गिरीश वासुदेव

आर्थिक घडामोडीचे अभ्यासक आणि आर्थिक सल्लागार म्हणून परीचीत असलेले ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री. गिरीश वासुदेव यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८२ वर्षाचे होते.

## श्री. सूर्या वाघ

ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी आमदार श्री. सूर्या वाघ यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ५३ वर्षाचे होते.

## श्री. श्रीधर माडगूळकर

प्रसिध्द लेखक श्री. श्रीधर माडगूळकर यांचे अल्पआजाराने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ७२ वर्षाचे होते.



Scanned by CamScanner

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब |
| --- | --- |
| | **(वित्त व लेखा विभाग)** |
| बाब क्र.१ | **मुंबई विद्यापीठाचे सन २०१८–१९ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१९–२०२० च्या अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या स्विकृती व अधिसभेच्या विचारार्थसाठी सादर करण्याबाबत.** |
| * ठराव | श्री प्रदिप सावंत व श्री राजन कोळंबेकर यांनी सदर अथसंकल्पाची बाब आयत्यावेळी पटलावर ठेवल्याने खेद व्यक्त केला व तशा स्वरुपाचे पत्र त्यांनी मा. कुलगुरुंना दिले.<br><br>सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क्र २ अन्वये सुधारणेसह सुचविलेल्या शिफारशींनुसार विद्यापीठाचा सन २०१८-२०१९ चा सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१९-२०२० चा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्पिय अंदाज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) (जी) प्रमाणे अधिसभेने मान्य करावा, अशी शिफारस करण्यात आली.<br><br>श्री दिपककुमार मुकादम, व्यवस्थापन परिषदेवरील कुलपतींचे नामनिर्देशित सदस्य यांना २०१८-१९ च्या सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेमध्ये सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले. जर यात काही तांत्रिक व कायदेशिर अडचण उद्‌भवल्यास प्राचार्य (डॉ) अजय भामरे, अधिष्ठाता वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांना २०१८-१९ चा सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१९-२०२० चा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेत सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले. |

* दिनांक 1 जुन 2019 रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्र. 1 नुसार व्य.प.दि. 23/2/2019 मधील इतिवृत्तातील बाब क्र. 1 च्या ठरावामध्ये दुरुस्ती करण्यात आली.

| | |
|---|---|
| | प्रो. वैभव नरवडे यांनी सुचविल्यानुसार परीक्षेकरिता प्रत्येक महाविद्यालयांना विद्यार्थी संख्येनुसार व प्रति विद्यार्थी किती रक्कम दिली जाते यांचा तपशील द्यावा. ~~याच्या तपशीलासह यादी व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत देण्यात यावी, असे ठरले.~~<br><br>अर्थसंकल्प समितीने अहोरात्र काम करून अर्थसंकल्प बनविला व यात मुख्यत्वे श्री दिपककुमार मुकादम, डॉ. सुप्रिया करंडे व श्री धनेश सावंत यांनी अभ्यासपूर्ण मोलाचे योगदान दिले असल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव प्राचार्य (डॉ) अजय भामरे यांनी मांडला व त्यास डॉ. सुभाष वाघमारे यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते अभिनंदनाचा ठराव मंजुर झाला. |

कुलसचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

20/3/19

कुलसचिव

22/3

प्र-कुलगुरू

22/03/19

कुलगुरू



Scanned by CamScanner